# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
## (शिक्षण विभाग)

जा.क्र. 4572/शि.वि./२०१५

दि.०९/०७/२०१५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
प्राथ./उच्च प्राथ. शाळा,
म.न.पा., नागपूर

**विषय :- शाळेमध्ये वर्गतुकडीवर वर्गशिक्षक नेमत असतांना रोटेशन पध्दती राबविण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सुचित करण्यात येते की, म.न.पा. शाळांच्या निरीक्षणादरम्यान निदर्शनास आले की, प्राथमिक शाळांमध्ये शिकवित असलेले शिक्षक वर्ग १ ते ४ पर्यंत एकच शिक्षक पहिल्या वर्गापासून वर्गाला ४ थी पर्यंत शिकवतो. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये कोणत्याही विद्यार्थ्याची इयत्ता १ ते ८ पर्यंत परिक्षा घ्यावयाची नसून त्यास अनुत्तीर्णही करावयाचे नाही. यामुळे विद्यार्थी वरच्या वर्गात जात असतांना एकच शिक्षक सतत ४ ते ५ वर्ग शिकवित असल्यामुळे त्रयस्थ व्यक्तींमार्फत विद्यार्थ्यांच्या इयत्तानुरूप क्षमताधिष्ठ ज्ञानाची तपासणी होत नाही. याचा परिणाम म्हणून विद्यार्थी वरच्या वर्गात प्रवेश घेतो. परंतू, मागिल इयत्तांचा त्याचा पाया काही प्रमाणात कच्चा राहातो.

हे टाळण्याच्या दृष्टीने शैक्षणिक सत्र २०१५-१६ पासून निर्देश देण्यात येतात की, शाळेमध्ये कोणताही शिक्षक एकाच वर्गाला सतत ४ ते ५ वर्ष न शिकविता (२००९.१०-१ ली, २०१०.११-२ री, २०११.१२ ३ री, २०१२.१३ ४ थी याप्रकारे) विद्यार्थ्यांची शाळेअंतर्गतच इतर शिक्षकांच्या माध्यमातून चाचणी व्हावी याकरीता इयत्ता ५ वी ला शिकविणारा शिक्षक इयत्ता ३ री ला शिकवेल, इयत्ता १ ली चा ४ थी ला, इयत्ता ४ थी चा २ री ला, व इयत्ता ३ री चा १ ली ला अशाप्रकारे वर्गशिक्षकांना रोटेशन करून वर्गशिक्षक नेमावे. कोणत्याही परिस्थितीत शिक्षकाला त्यानी शिकविलेला मागच्या वर्षीचा वर्ग शिकविण्यासाठी नेमू नये.

याबाबत अडचणी निर्माण होत असल्यास आपले झोन चे शाळा निरीक्षकांना संपर्क साधून सोडवून घ्याव्यात.

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

प्रतिलिपी -

१. मा.आयुक्त, म.न.पा., नागपूर
२. मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर
३. सर्व शाळा निरीक्षक, झोन क्र.१ ते १० म.न.पा., नागपूर यांनी आपल्या स्तरावर मुख्याध्यापकांच्या अडचणी दूर करून रोटेशन पध्दतीने शिक्षक नेमण्याकरीता मुख्याध्यापकांना आवश्यक तेथे निर्देश दयावेत.

PC:3/C:/SRW/letter.doc